POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५४ ● मुंबई, शुक्रवार,२६ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## नवसाला पावणारी आदिशक्ती आदिमाया नवदुर्गेची स्थापनेचे चौथे वर्ष
## मराठी एकीकरण बातमीपत्र कार्यालयात केली भव्य पूजा



■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

कल्याण : मराठी एकीकरण बातमीपत्र या लोकप्रिय दैनिकाच्या कार्यालयात नवसाला पावणारी आदिशक्ती आदिमाया नवदुर्गा प्रतिष्ठापना करण्यात आली. या वर्षी देवीच्या ४ वर्ष असून भाविकांमध्ये मोठ्या श्रद्धेने आणि भक्तीभावाने उत्साह पाहायला मिळाला.

यावेळी विधीवत पूजा-अर्चा, मंत्रोच्चार आणि देवीची आरती करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्तगण आणि वाचकांना दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले आहे. देवीच्या दर्शनाने कार्यालयात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी देवीसमोर मनोभावे प्रार्थना अर्पण केल्या. मराठी एकीकरण बातमीपत्राने केलेल्या या उपक्रमामुळे कार्यालयीन परिसरात आनंद, श्रद्धा आणि ऐक्याचे वातावरण अनुभवायला मिळत आहे.

> **“ देवीची स्थापना संपादक डॉ. दीपक मोरेश्वर नाईक आणि कार्यकारी संपादक सौ. प्रीती नाईक यांच्या हस्ते संपन्न झाली.**

**देवीचे आगमन आणि वाहन**


**शशिसूर्ये गजारूढ़ा , शनिभौमे तुरंगमे ।**
**गुरुशुक्रे च दोलायां बुधे नौका प्रकीर्तिता ।।**
**फलम- गजे च जलदा देवी , छत्रभङ्ग तुरंगमे ।**
**नौकायां सर्व सिद्धिस्यात दोलायां मरणं धुव्रम ।।**

शारदीय नवरात्रौत्सवाची सुरुवात सोमवारपासून होत आहे. नवरात्रीचा काळ अत्यंत शुभ आणि मंगलमय मानला जातो. या 10 दिवसांच्या काळात देवीचे पृथ्वीवर आगमन होते आणि भक्तांना आशीर्वाद देते, अशी मान्यता आहे. शास्त्रानुसार, देवी कोणत्या दिवशी आणि कोणत्या वाहनावर पृथ्वीवर आगमन करते याचे विशेष संकेत आणि महत्त्व असतात. यामुळं वर्षभरातील शुभ-अशुभ संकेत मिळतात. हिंदू पंचागानुसार, यंदा शारदीय नवरात्रीची सुरुवात सोमवार 22 सप्टेंबरपासून झाली आहे. तर, समारोप 2 ऑक्टोबर 2025 रोजी विजयादशमीला होणार आहे.

## मुंबई लोकलमध्ये बसायला सीट मिळाली नाही, तरुणाने केलेला जुगाड पाहून तुम्हालाही बसेल शॉक

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई लोकल ट्रेनमधील एक फोटो सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. हा फोटो पाहून अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. या फोटोत स्पष्टपणे दिसत आहे की एक व्यक्ती सीटवर किंवा खाली झोपलेला नाहीये तर जिथे सामान ठेवण्यात येते तिथे चक्क झोपला होता. मुंबई लोकलमधील हा फोटो पाहून अनेक प्रवाशांना आश्चर्यचकित केले आहे. गर्दीच्या वेळी ट्रेनमध्ये बसायला जागा नसेल तर लोक दरवाजाजवळ खाली बसतात. मात्र या व्यक्ती थेट सामान ठेवण्याच्या जागेवर जाऊन शांतपणे झोपला आहे. या फोटो सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. या व्यक्तीची ही आयडिया काही लोकांना चांगलीच आवडली आहे. काही नेटकऱ्यांना हा फोटो मजेशीर वाटला तर काहींनी या फोटोवर चिंता व्यक्त केली आहे. या फोटोतील व्यक्ती फारच थकलेला व तणावात असेल म्हणून त्याला अशा जागी झोपावं लागलं. त्याने हाताची वळकटी करुन त्यावर डोकं ठेवून झोपला आहे. ट्रेनमध्ये असलेले प्रवासी त्याच्याकडे आश्चर्याने पाहत पुढे जात आहेत. आत्तापर्यंत रेल्वे अधिकाऱ्यांनी या व्हायरल फोटोवर कोणतेही वक्तव्य केले नाहीये. मात्र जे लोक दररोज मुंबई लोकलने प्रवास करताय त्यांच्या म्हणण्यानुसार हे दृश्य सामान्य आहे. मुंबई लोकलला मुंबईकरांची जीवनवाहिनी म्हटलं जातं. गर्दीच्या वेळेला बसायला सीट तर सोडाच पण ट्रेनमध्ये चढणेही मुश्कील होऊन जाते. अशातच हा व्यक्ती फारच थकलेला होता आणि जागा पाहून तिथेच झोपून गेला. आता या घटनेवर रेडिटवर वेगवेगळ्या कमेंट येत आहे. काही लोकांनी लोकल ट्रेनच्या गर्दीत स्वतःसाठी जागा शोधली आहे. पण काही जणांनी मात्र चिंता व्यक्त केली आहे. कारण ट्रेनने ब्रेक घेतल्यानंतर तो खाली पडू शकतो त्यामुळं दुर्घटना होऊ शकतो. एका युजरने म्हटलं आहे की, देवाच्या कृपाने या शहरात प्रत्येकाला आराम करण्यासाठी जागा मिळुदेत. तर. दुसऱ्या युजरने म्हटलं आहे की, त्याला झोपू द्या रे, तो किती थकलेला आहे. तो त्याच्यासाठी व त्याच्या कुटुंबासाठी मेहनत करतो. तर, एकाने म्हटलं आहे की, मी त्याचा थकवा समजू शकतो.



## सातपाटी दांडीपाडा परिसरात कंटेनर आढळले; पोलिसांची तातडीने कारवाई



■**पालघर। प्रतिनिधी,**

पालघर जिल्ह्यातील सातपाटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मौजे माहिम टेंभी गाव परिसरात दिनांक 24/09/2025 रोजी सकाळी 09.00 वा. सुमारास स्थानिक मच्छीमार बांधवांनी एक कंटेनर समुद्राच्या लाटांमुळे किनाऱ्यावर आल्याची माहिती सातपाटी पोलिसांना दिली. माहिती मिळताच सातपाटी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सदर ठिकाणी पाहणी करून कस्टम विभाग, कोस्ट गार्ड विभाग, एम.एम.बी. वनविभाग तसेच इतर संबधित विभागांना अवगत करून घटनास्थळी पाचारण करण्यात आले. सदर कंटेनर मध्ये ऑईल सदृश्य पदार्थ असल्याचे निदर्शनास आल्याने ते लिक होवुन समुद्री जीवास धोका होवु नये याकरीता भरती-ओहोटीच्या अंदाजानुसार क्रेनच्या सहाय्याने कंटेनर सुरक्षितपणे किनाऱ्यावर हलविण्यात आले आहे.

सदर घटनास्थळी पालघर पोलीस अधीक्षक श्री. यतिश देशमुख भापोसे यांचे मार्गदर्शनाखाली सातपाटी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि उध्दव सुर्वे हे इतर संबंधित विभागाचे मदतीने कार्यवाही करीत आहेत.

## राज्य सरकारचा पूरग्रस्तांना मोठा दिलासाः मृतांच्या कुटुंबियांना ४ लाख, गुरांसाठीही मदत



■**मुंबई । प्रतिनिधी,**

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारकडून पूरग्रस्तांना तातडीने मदत पोहोचवली जात आहे. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सरकारने सर्वकष उपाययोजना हाती घेतल्या आहे. पावसाशी संबंधिक विविध दुर्घटनांमध्ये राज्यात आतापर्यंत ८४ जणांचा बळी गेला आहे. सरकारकडून पंचनामे तसेच पाहणी दौरे युद्धपातळीवर केले जात आहे.

तसेच आठ दिवसांच्या आत पूरग्रस्तांना सरकारकडून मदत दिली जात आहे. पूरग्रस्त नागरिकांना दिलासा मिळवा यासाठी सरकारने सर्व यंत्रणा कामाला लावल्या आहेत. त्यांना तातडीने आर्थिक मदत केली जावी अशा प्रकारचे थेट आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या मदतीमध्ये जीवितहानी आणि मालमत्तेच्या नुकसानीसाठी भरपाईचा समावेश आहे.

सरकारने जाहीर केलेल्या निर्णयानुसार, पूर आणि अतिवृष्टीमुळे मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना ४ लाख रुपयांची मदत दिली जाईल. तसेच, या नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांच्यासाठीही भरीव मदत पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. यानुसार, कोरडवाहू पिकांसाठी प्रति हेक्टरी ८,५०० रुपये तर बागायती पिकांसाठी १७,५०० रुपये मदत दिली जाणार आहे.


याशिवाय, पूर आणि पावसामुळे ज्यांची जनावरे दगावली आहेत, त्यांच्यासाठीही नुकसान भरपाईची तरतूद करण्यात आली आहे. यानुसार, दुभत्या आणि मोठ्या जनावरांच्या मृत्यूप्रकरणी ३७,५०० रुपये तर शेळ्या आणि मेंढ्यांसाठी ४,००० रुपये मदत दिली जाईल.

या मदतीमुळे पूरग्रस्तांना मोठा दिलासा मिळणार आहे. सरकारने नुकसानीचे निकष शिथिल करून मदत नागरिकांपर्यंत लवकर पोहोचवण्याचे आश्वासन दिले आहे. यासोबतच, अनेक सामाजिक संस्था आणि मंडळांनीही पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. मुंबईतील प्रसिद्ध 'लालबागचा राजा' मंडळाने पूरग्रस्तांसाठी ५० लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. हे मदत पॅकेज जाहीर करून सरकारने पूरग्रस्तांना पाठिंबा दिला आहे, ज्यामुळे संकटाच्या या काळात त्यांना काही प्रमाणात दिलासा मिळेल.

स्थापना: १९९२ || एकी हेच बळ || रजि.नं. महाराष्ट्र/१३१८/२००२/पुणे

आझाद युवक मंडळ
वर्ष ३३ वे

आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट
समता संस्कार सेवा फॉउंडेशन



भव्य आरोग्य शिबिर व मोफत नेत्रचिकीत्सा शिबिर

डोळे (मोफत मोतीबिंदू ऑपरेशन)
हृदय (एन्जोग्राफी (कमी किमतीत)
मोफत एंजोप्लास्टी व बायपास)
कॅन्सर (मोफत कॅन्सर सर्जरी)
किडनी (मोफत किडनी स्टोन)

रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२५ | वेळ : स. ११ ते दु. ३ पर्यंत

शिबिरात देण्यात येणाऱ्या सुविधा

डोळे तपासणी (कमी किमतीत चष्मा वाटप)
कमी किमतीत कानाची मशीन
B.P, गरजेनुसार शुगर तपासणी
डॉक्टरांचा सल्ला (ईसीजी)
कमी किमतीत मल्टी विटामिन गोळ्या
बी.एम. आय / अस्थमा चेकअप
त्वचा रोग (कमी किमतीत
चामखीळ काढणे)

मोफत जनरल सर्जरी: कोणत्याही प्रकारचे ऑपरेशन मोफत किंवा कमी किमतीत करून देण्यात येतील (मुंबईमध्ये)

स्थळ : सर्वे. नं. १४९, माउली नगर चौक, सुखवानी इमराल्ड च्या मागे, मगरपट्टा, हडपसर, पुणे १३



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक


# सरकारने आता तरी बोध घ्यावा...



मराठवाडा एखादी दुर्घटना घडल्यावरच सरकारी यंत्रणेला जाग येते. पण ती टाळण्यासाठी आधीच ठोस उपाय योजले जात नाहीत. अपघात घडल्यावर त्याची चौकशी, समिती नेमणे, समितीचा अहवाल, मग अहवालावर पुढील कारवाई, खरे दोषी नामानिराळे ही सरकारी कारभाराची रीतच. १३ मे २०२४ या दिवशी दुपारी जोरदार वारा आणि मुसळधार पावसात मुंबईतील घाटकोपर येथे पेट्रोलपंपाजवळ १२० फूट रुंद, १४० फूट लांब तर १८० फूट उंच एवढा अवाढव्य अनधिकृत फलक (होर्डिंग) पडून १७ निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला तर ८० हून अधिक जखमी झाले.

हा फलक अनधिकृत होता, ठेकेदार आणि सरकारी यंत्रणेत हातमिळवणी झाली होती, हे चौकशीत निष्पन्न होऊनही ठेकेदाराने ही 'दैवी आपत्ती' (अॅक्ट ऑफ गॉड) असल्याचा अजब युक्तिवाद न्यायालयात केला होता. या दुर्घटनेच्या चौकशीसाठी शासनाने निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले समिती नेमली होती. तिचा अहवाल स्वीकारून मंत्रिमंडळाने त्यातील शिफारशींची महिनाभरात कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. आधी या फलकाची जागा कोणाची याचा घोळ घालण्यात आला. ती रेल्वेची असल्याने राज्य शासनाचे नियम लागू होत नाहीत, असा युक्तिवाद रेल्वे पोलिसांनी केला होता. पण ती जमीन महाराष्ट्र शासनाची होती हे चौकशीत स्पष्ट झाले. फलक उभारण्यासाठी मुंबई महानगरपालिकेची परवानगी, नियम, उच्च वाऱ्याच्या दाबात टिकून राहण्यासाठी आवश्यक सरंचना, मजबूत पाया या साऱ्या निकषांकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता तसेच सुरक्षेचे नियम डावलून हा फलक उभारण्यात आला होता. मुंबई महानगरपालिकेने फलकासाठी ४० फूट रुंद आणि ४० फूट लांबीची मयार्दा निश्चित केली असताना त्याच्या तिप्पट आकाराचा फलक उभारण्यात आला होता. पाया मजबूत असता तर एवढा अवाढव्य फलक कोसळला नसता, असे 'व्हीजेटीआय'च्या तांत्रिक चौकशीत आढळले. या दुर्घटनेची सारी जबाबदारी तत्कालीन रेल्वे पोलीस आयुक्त कैसर खालीद यांची असल्याचा ठपका चौकशी समितीने ठेवला आहे. दुर्घटनेनंतर राज्य शासनाने खालीद यांना निलंबित केले होते. सरकारने आता अहवाल स्वीकारला असल्याने खालीद यांना सेवेतून बडतर्फ करून कायमचे घरी बसविणेच योग्य ठरेल. त्यातून अन्य अधिकाऱ्यांमध्ये सूचक इशारा जाऊ शकतो. मुंबईसह राज्यातील छोटी-मोठी शहरे किंवा गावागावांमध्ये फलक उभारण्याची गेल्या काही वर्षांमध्ये स्पर्धा सुरू आहे. गल्लीतील छोटा कार्यकर्ता राष्ट्रीय नेता असल्याच्या आविभार्वात स्वतःची छबी झळकवत असतो. मोक्याच्या जागी फलक लावण्यावरून हिंसाचाराचे प्रकार घडले आहेत. गावोगावी 'होर्डिंग सम्राट' तयार झाले आहेत. लोकांचे लक्ष वेधले जाईल अशा जागांवर मोठाले फलक लावले जातात. उच्च न्यायालयाने बस स्थानके, सार्वजनिक ठिकाणांवर फलक लावण्यास मनाई केली तरीही राजकीय नेत्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे फलक जागोजागी लागलेले दिसतात. सर्व नियम डावलून जाहिरातबाजीसाठी फलक लावले जातात व त्याकडे महानगरपालिका दुर्लक्ष करते. न्या. दिलीप भोसले समितीने यावर नेमके बोट ठेवले आहे. वाहनचालक किंवा पादचाऱ्यांचे लक्ष विचलित करणाऱ्या फलकांना परवानगी देऊ नये, अशी महत्त्वपूर्ण शिफारस या समितीने केली. अलीकडे आकर्षक आणि चकाकते डिजिटल फलक बसविले जातात. त्यातून अपघातांना निमंत्रण मिळते. त्यामुळे ग्राफिक्स व मजकूर सतत हलता वा खालीवर होणारा (स्क्रोलिंग) असेल, असे फलक लावू नयेत, अशी सूचना करण्यात आली आहे. मुंबईसह राज्यात कुठेही फलकाचा आकार हा ४० फूट रुंद आणि ४० फूट लांब एवढा असावा. गच्ची वा संरक्षक भिंतींवर हे फलक लावू नयेत, अशीही आणखी महत्त्वपूर्ण शिफारस सरकारने स्वीकारली आहे. पैसे कमविण्यासाठी अनेक सोसायट्यांच्या गच्चीवर जाहिरात फलक अथवा मोबाइल टॉवर्स बसविले जातात. अनधिकृत फलक असल्यास हटवावेत किंवा दंड आकारावा, या नियमांचा प्रभावीपणे वापर करण्यास महानगरपालिकांना सांगण्यात आले आहे. शहरे काय किंवा गावे काय, फलक बसविणारे राजकीय पक्षांशी संबंधित असतात किंवा सत्ताधाऱ्यांचे निकटवर्तीय. त्यांच्याविरोधात कारवाई करण्यास पालिका प्रशासन कुचराई करते. घाटकोपरच्या दुर्घटनेनंतर बोध घेऊन सरकारी यंत्रणा अनधिकृत फलकांच्या विरोधात कठोर कारवाई करेल ही अपेक्षा आहे. पुण्यातही अनधिकृत फलक कोसळून काही वर्षांपूर्वी चार जणांचा मृत्यू झाला होता. अहवालाच्या अनुषंगाने सरकारने एक महिन्याच्या मुदतीत कार्यवाही करण्याचा आदेश सर्व महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे. अनधिकृत इमारत कोसळल्यावर काही दिवस सर्व शहरांमधील अनधिकृत इमारतींच्या विरोधात कारवाईचे नाटक होते पण पुन्हा येरे माज्या मागल्या अशी अवस्था असते. फलकांबाबत तसे होऊ नये एवढेच.

# अगतिक आणि असहाय



अमेरिकी अध्यक्षांचे अशास्त्रीय वर्तन, त्यांच्या अशास्त्रीय धारणा या त्या देशाला घोर लावणाऱ्या आहेत हे त्यांच्या वक्तव्यांमधून पुन्हा पुन्हा दिसून येते. आपल्याला ज्याबाबत काडीचाही गंध नाही, त्यावर केवळ सत्तेच्या जोरावर भाष्य करणारे अंतिमतः हास्यास्पद ठरतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे या सत्याचे जागरूक, जितेजागते उदाहरण. नुकताच त्यांनी गर्भवती स्त्रियांनी पॅरासिटॅमोल हे औषध घेतल्यास अपत्य स्वमग्न (ऑटिस्टिक) जन्मते, असा शोध लावून गर्भवती स्त्रियांना हे औषध न घेण्याचा सल्ला दिला. यासाठी कोणीतरी संशोधन केले, नमुना चाचण्या घेतल्या असे काही नाही. ट्रम्प यांना वाटले, त्यांनी ते सांगितले. या गतीने उद्या ते गर्भसंस्काराचा पुरस्कार करण्यासही मागेपुढे पाहणार नाहीत. त्यांचे आरोग्यमंत्री रॉबर्ट एफ. केनेडी (दुसरे) हे अध्यक्षांहून दिव्य. काही राज्यांतून ते बालकांसाठीचे सर्व प्रकारचे लसीकरण बंद करू इच्छितात. करोना काळातही प्रतिबंधात्मक लस टोचून घेण्यास ज्यांचा विरोध होता त्यातील हे दोन विद्वान. या अशा विज्ञानदुष्ट व्यक्ती एखादा आश्रम वा आरोग्य केंद्र चालवत असल्यास त्याबाबत कोणाचा आक्षेप असण्याचे कारण नाही. पण अमेरिकेसारख्या महासत्तेच्या प्रमुखपदावरून अशा व्यक्ती विज्ञानद्रोह करतात, तेव्हा त्याचे दुष्परिणाम व्यापक होतात.

ट्रम्प यांनी संयुक्त राष्ट्रांच्या ८० व्या वर्धापनदिनी केलेले भाषण असे दुष्परिणामकारी होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वर्धापन दिन समारंभात भाषण करताना हे महाशय विज्ञानद्रोहाबरोबरीने आपणास किमान पाचपोचही कसा नाही, त्याचे दर्शन घडवत होते. म्हणून त्याची चिरफाड करणे आवश्यक.

एखादी व्यक्ती/संघटना किती निष्क्रिय आहे आणि तिच्या अस्तित्वाचे काही प्रयोजन राहिलेले नाही असे काही कोणी ती व्यक्ती/संघटना यांच्या जन्मदिन सोहळ्यात सांगणार नाही. तसे करणे असभ्य आणि औद्धत्याचे ठरेल. पण ट्रम्प तेच करतात. ही संघटना किती निरुपयोगी आणि नष्क्रिय आहे हे ते त्याच संस्थेच्या वर्धापन दिन समारंभात नमूद करतात. यामुळे केवळ शिष्टाचारभंगच झाला असे नाही, तर त्यातून जबाबदारी झटकणेही दिसून आले.

यूएनसारखी संघटना जर निष्प्रभ होत असेल तर त्यामागे अमेरिका हे एकमेव कारण आहे. ज्या वेळी सामर्थ्यवानच नियमभंग, संकेतभंग करत असतो तेव्हा सर्वसामान्यांसही तसे वागण्याची प्रेरणा मिळत असते. 'यूएन'सारख्या संघटनेचे अमेरिकेमुळे हे असे झाले आहे. पहिल्या महायुद्धानंतर वुड्रो विल्सन यांच्यासारख्या द्रष्ट्या अमेरिकी अध्यक्षांच्या पुढाकारामुळे या संघटनेचा पाया रचला गेला. त्याआधी, त्या काळात आणि नंतरही तिची सैद्धांतिक पाठराखण केली ती अल्बर्ट आईन्स्टाईनसारख्या तत्त्वज्ञ संशोधकाने.

शांतिवादी आईन्स्टाईन अशा आंतरराष्ट्रीयवादाचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यामुळे यहुदींवरील अत्याचारांविरोधात त्यांनी आवाज उठवला तरी फक्त यहुदींच्या संकुचितवादी इस्रायलचे ते समर्थक नव्हते. अशा विचारी जनांच्या प्रयत्नांतून आजची यूएन आकारास आली. एवढा काळ तिचे सर्वात मोठे समर्थन सातत्याने केले ते अमेरिकेने. जागतिक बँक असो वा संयुक्त राष्ट्र. अमेरिकेने यांसाठी आपला हात कधीही आखडता घेतला नाही.

तथापि व्हाइट हाऊसमध्ये ट्रम्प यांची प्राणप्रतिष्ठा झाली आणि सगळेच चित्र बदलले. एक तर त्यांची मेक अमेरिका ग्रेट अगेनची मागा संकुचित भूमिका. त्यापाठोपाठ त्यांच्याकडून आंतरराष्ट्रीय संस्थांसाठीच्या निधीस लागलेली कात्री. आणि तिसरे आणि अधिक दुदैर्वी कारण म्हणजे अशा आंतरराष्ट्रीय संघटनेचाच भाग असलेल्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाने ठपका ठेवूनही ट्रम्प यांच्याकडून सुरू असलेली इस्रायलची पाठराखण. या तीनही कारणांचे दर्शन ट्रम्प यांच्या तेथील भाषणात झाले.

'हमास' या दहशतवादी संघटनेने इस्रायलवर केलेल्या नृशंस दहशतवादी हल्ल्याचे स्मरण त्यांना झाले, ते योग्यच. पण त्यानंतर इस्रायलने पॅलेस्टिनींचा वंशच्छेद चालवलेला आहे त्याबद्दल एक चकार शब्द त्यांनी या भाषणात काढला नाही. 'हमास'च्या बेजबाबदार हल्ल्याचे निमित्त इस्रायलला मिळाले आणि त्या देशाने आजपर्यंत ६० हजारांहून अधिकांचे शिरकाण केले. त्यात जवळपास २० हजार तर बालकेच आहेत. ती कोणत्या कोनातून दहशतवादी ठरतात याबद्दल ट्रम्प यांनी भाष्य केले असते तर त्यातून त्यांचा मोठेपणा तरी दिसला असता.

पण तोच मुळात अंगी नसल्यामुळे दिसणे अवघडच. या शिरकाणासाठी संयुक्त राष्ट्रे, आंतरराष्ट्रीय न्यायालय अशा अनेक जागतिक संघटनांनी इस्रायलला दोषी ठरवलेले आहे. पण ट्रम्प यांच्या अमेरिकी मागा हृदयास काही घरे पडताना दिसत नाहीत. फ्रान्स, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आदी अमेरिकी गटातील अनेकांनी ट्रम्प यांची साथ सोडून पॅलेस्टिनच्या अस्तित्वास मान्यता देण्याचे पाऊल उचलले आहे. तथापि अमेरिकेचा वरदहस्त जोपर्यंत खलनायकी इस्रायली पंतप्रधानांच्या डोक्यावर आहे, तोपर्यंत कोणतीही मानवतावादी विचारी संघटना यशस्वी ठरणार नाही. म्हणजे संयुक्त राष्ट्राच्या अपयशाचे एक महत्त्वाचे कारण ट्रम्प हेच आहेत.

याच भाषणात ट्रम्प यांनी युरोपीय देशांवर आगपाखड केली. वास्तविक देशांची अंतर्गत धोरणे हा त्या देशाचा अंतर्गत मुद्दा. ट्रम्प त्यावरही भाष्य करण्यात मागेपुढे पाहात नाहीत. या देशांच्या स्थलांतरितांबाबतच्या धोरणांमुळे त्याचे नरक झाले आहेत आणि परिणामी त्या देशांची परिस्थिती बिकट झालेली आहे हे ट्रम्प यांचे इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आदी देशांस उद्देशून विधान. पण मुळात या देशांची उठाठेव ट्रम्प यांनी करण्याचे प्रयोजनच काय? त्या देशांतील नागरिकांनी ट्रम्प यांच्याकडे मदतीची याचना केली, ट्रम्प यांचा धावा केला असेही नाही.

पण ट्रम्प यांना या कशाचेच सोयरसुतक नाही. इतकेच नव्हे तर लंडनसारख्या शहराचा महापौर किती 'हॉरिबल... हॉरिबल' आहे हे सांगण्याचा अव्यापारेषु व्यापार ट्रम्प व्यासपीठावर करतात. त्यांच्या दृष्टीने लंडनचा महापौर हॉरिबल आहे कारण त्याचे नाव 'सादिक खान'. ट्रम्प तेथेच थांबत नाहीत. लंडनमध्ये शरिया लागू करण्याचा या महापौराचा प्रयत्न आहे असे बेधडक विधान ते करतात. सादिक खान हे त्या शहरातून निवडून आलेले आहेत.

उद्या न्यू यॉर्कच्या महापौरपदी झोराब ममदानी निवडून आले तर ट्रम्प काय करणार? आणि दुसरे असे की त्यांचा हा इस्लाम-धर्म विरोध प्रामाणिक असता तरीही एक वेळ तो क्षम्य ठरवता आला असता. पण ट्रम्प यांची ही धर्म भूमिकाही मतलबी आहे. सौदी राजपुत्राकडून स्वतःच्या कंपनीसाठी, जामातासाठी व्यवसायसंधी मिळत असल्याने, पाकिस्तानकडून त्यांच्या कंपनीत गुंतवणूक होत असल्याने त्यांचा इस्लाम गोड मानून घेण्यास ट्रम्प तयार. म्हणजे त्यांच्या धर्मनिष्ठाही पोकळ.

तिसरा मुद्दा वसुंधरेच्या तापमानवाढीचा. तापमानवाढ हा मुद्दा सर्वात मोठा घोटाळा आहे, असे हा गृहस्थ संयुक्त राष्ट्राच्या व्यासपीठावरून म्हणतो. अमेरिकेसह जगभरातील अनेक देशांस भेडसावणाऱ्या पर्यावरणीय समस्या, वादळे, पूर, दुष्काळ या सगळ्याचा वातावरणीय बदलाशी काहीही संबंध नाही असे ट्रम्प यांस वाटते. ते तसे बोलूनही दाखवतात. तुम्ही पर्यावरणस्नेही ऊर्जा व्यवसायापासून दूर गेला नाहीत तर तुमचे देश अपयशी ठरतील, अशी भविष्यवाणी ट्रम्प आपल्या भाषणात व्यक्त करतात.

अमेरिकी अध्यक्षांचे हे अशास्त्रीय वर्तन, त्यांच्या अशास्त्रीय धारणा या त्या देशाला घोर लावणाऱ्या आहेत हे त्यांच्या भाषणातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले. सहा वर्षांपूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून ट्रम्प यांनी पहिल्यांदा जेव्हा संयुक्त राष्ट्र सभेस संबोधित केले तेव्हा त्या वेळी त्यांचे अशास्त्रीय दावे, असत्य कथने आणि आचरट विधाने उपस्थितांनी हसण्यावर नेली. या वेळी त्यांच्या समोरचे आणि हा समारंभ दूरचित्रवाणीवर पाहणारे सुन्न होते. सत्ताधीश जेव्हा इतके अज्ञानी होतात तेव्हा शहाण्यांचे अगतिक आणि असहाय होणे अपरिहार्य असते.

# आपत्तीग्रस्तांना भरपाई जाहीर होईल, पण मिळेल का?



खरे तर सप्टेंबर-ऑक्टोबर हे खरीप सुगीचे आणि सणवारांचे महिने आहेत. खरिपातील पीके हाती आलेली असतात. त्यातून सणावारांचा आनंद द्विगुणीत होतो. परंतु या वर्षी शेतीशिवारात पावसाने थैमान घातले असून, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. यावर्षीची ही काही पहिलीच आपत्ती नाही. जुलै, ऑगस्ट आणि आता सप्टेंबर या तिन्ही पावसाळी महिन्यात अतिवृष्टीने पिकांची अक्षरशः राखरांगोळी केली. अनेक ठिकाणी काढणीला आलेले सोयाबीन पाण्यात आहेत. कापसाची बोंडे शेतात साचलेल्या पाण्यात सडत आहेत. नदी-नाले परिसरात पिकांबरोबर शेतातील माती एवढेच नव्हे, तर ट्रॅक्टर, कडबा, कुट्टी, सोलर पंप, खते तसेच धान्याची पोती, सूक्ष्म सिंचन संच आदी साहित्य पुराच्या पाण्यात डोळ्यांदेखत वाहून गेले आहे. काही ठिकाणी तर जीवितहानीही झाली आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचा आकड्यांत अंदाज बांधणे कठीण आहे. मराठवाड्यासह अहिल्यानगर, सोलापूर, तसेच काही प्रमाणांत जळगाव यांसारख्या भागांनाही जबरदस्त तडाखा बसला आहे. राज्यभरात खरिपाचे क्षेत्र १४४ लाख हेक्टर असून, त्यांपैकी सुमारे १३५ लाख हेक्टरवर पेरा होता. त्यातील २६ लाख हेक्टर (२० टक्के क्षेत्र) अतिवृष्टीने पुरते बाधित झाले आहे. शेतकऱ्यांचे वैयक्तिक नुकसान तर झाले आहेच, पण त्याचबरोबरच राज्याच्या अर्थव्यवस्थेचीही मोठी हानी झाली आहे. लहरी पर्जन्यमानाचा जबरदस्त फटका यावेळी मराठवाड्याला बसला असून, त्यामुळे झालेली जीवितहानी, आर्थिक नुकसान, पशुधनाची हानी, विस्थापन हे सारेच अतिशय गंभीर स्वरूपाचे आहे. राज्यभरातील मुसळधार पावसाची दखल घेत राज्य सरकारने आतापर्यंत दोन हजार २१५ कोटी रुपयांची तातडीची मदत मंजूर केली आहे. तसेच संबंधित पालकमंत्र्यांनी व लोकप्रतिनीधींनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधांवर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्याचे राज्य सरकारने आदेश दिले आहेत. वास्तविक, मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर केला तर या भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. गेली काही वर्षे पावसाअभावी तळमळणाऱ्या मराठवाड्याने अशा प्रकारच्या संकटाची कल्पनाही केली नव्हती; यावर्षी मात्र अतिवृष्टीने अचानक या भागाला जेरीस आणले. या पावसाने धरणे, तलाव, नद्यांचे काठ ओलांडून पाणी शिवारात शिरल्याने प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. हजारो हेक्टरवरील पिके उद्धवस्त झाली. कापूस, सोयाबीन, मका, ऊस, उडीद, मूग, कांदा अशा प्रमुख पिकांसह बागायती फळपिकेही नष्ट झाली आहेत. शेतात पाणी साचून राहिल्याने पीके अक्षरशः सडली आहेत. काही भागात दोनदा पेरणी करूणही वाया गेली. आता शेतकऱ्यांकडे पुढील पेरणीसाठी ना पैसा उरला आहे ना मनोबल. या संकटामुळे शेतकरी आणखी कर्जबाजारी होण्याच्या उंबरठ्यावर आहे. हातात पीक नाही अन् त्यात कर्जाचे ओझे आणि त्यात प्रशासन मदतीची हुलकावली देत आहे. या परिस्थितीत शेतकरी मानसिकदृष्ट्याही कोलमडू लागले आहेत. याशिवाय पावसाच्या तांडवाचा सर्वांत भयावह परिणाम म्हणजे नद्यांना आलेले महापूर होय. धाराशिव जिल्ह्यात भूम, परांडा भागात तर या पुराने अक्राळविक्राळ रूप धारण केले. भूम तालुक्यातील चिंचोली गावात ओढ्याचे पाणी घरात शिरल्याने एक वृद्ध महिला आणि तिच्या मतिमंद मुलाला जीव गमवावा लागला. अनेक ठिकाणी नद्यांना पूर आल्याने, गावांना पाण्याचा वेढा पडला. गोदावरी, मांजरा, पूर्णा, सिंदफना, तेरणा आणि त्यांच्या उपनद्यांनी रौद्ररूप धारण केले. यात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दल तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन दलांमार्फत बोटी आणि हेलिकॉप्टर्सच्या माध्यमातून बचावकार्य करावे लागत आहे. मराठवाड्यातील परिस्थित हा जेवढा निसगार्चा कोप आहे तेवढीच त्याला ग्रामीण भागातील मनोवृत्तीही कारणीभूत आहे. पाऊस पडत नव्हता तेव्हा नदी, नाले कोरडेठाक पडत. ते वाहत नाहीत म्हणून बुजवलेही जात असत. त्यावर अतिक्रमण करत शेतीही केली जाते. तसेच थोड्याफार पाणथळ जागेत वाळूउपसा करून नद्यांच्या पात्रांची अस्ताव्यस्त पद्धतीने चाळणी केल्याने हे कोपाचे कारण ठरते आहे. नैसर्गिक प्रवाह बदलले जातात, त्यामुळे नद्या, ओढ्यांची नैसर्गिक रचना मोडीत निघते परिणामी नद्या अनेक ठिकाणी किनाऱ्याच्या सीमा ओलांडू वाहू लागल्या. यातून उद्भवलेल्या स्थितीने पिके तर वाहून गेलीच, पण रस्ते, पूल यांनादेखील धोका निर्माण झाला आहे. पुणे-सोलापूर रस्त्यावर पाणी आल्याने काही काळ रस्तेवाहतूक तसेच या मार्गावरील सर्व रेल्वेसेवांवर याचा विपरीत परिणाम झाला. अनेक रस्ते वाहून गेले आहेत. अतिवृष्टीमुळे ग्रामीण रस्त्यांची आक्षरशः चाळण झाली आहे. अनेक गावांचा मुख्य मार्गांशी संपर्क तुटल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. गावांची बाजारपेठेतील क्रियाशिलताही हरवली आहे. सार्वजनिक वाहतूक ठप्प झाल्याने विद्यार्थ्यांपासून ते रुग्णांपर्यंत सर्वांचीच ससेहोलपट होत आहे. गावपातळीवरील किराणा दुकानदार, छोटे-मोठे व्यवसाय, कुटीरोद्योग, पीक प्रक्रिया करणाऱ्या यंत्रणा यांच्यावरही त्याचे गंभीर परिणाम होत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसलेला हा जबरदस्त फटका प्रत्येक शेतकऱ्यांच्या जीवनावर विपरित परिणाम करणारा ठरेल, हे ओघाने आलेच.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी अतिवृष्टीग्रस्त व पूरग्रस्तांसाठी मदत निधीची घोषणा केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी दसऱ्यापर्यंत शेतीच्या नुकसानीचे पैसे देण्यात येतील असे म्हटले, त्यातच कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, असे सांगितले. या तीन मंत्र्यापैकी खरे कुणाचे हा प्रश्नच आहे! त्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी तर सप्टेंबर अखेर किंवा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मदतीची ग्वाही दिली आहे. परंतु या सर्व घोषणा औपचारिक असतात. नैसर्गिक आपत्तीत आतापर्यंत शेतकऱ्यांना आलेला अनुभव वेगळाच आहे. नुकसानग्रस्त भागांची नीट पाहणी, पंचनामे होत नाहीत. शासनाची प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांपर्यंत आजही पोहचत नाही. ज्यांना कुणाला मदत मिळते तीही तुटपुंजी असते. यावर्षी पीकविम्याला थोडा कमीच प्रतिसाद मिळाला असून, त्यातही नूकसानीचे महत्वाचे ट्रिगर्स कमी केल्याने विमा भरपाई मिळण्याच्या आशाही कमी झाल्या आहेत. शासकीय मदत जून्या निकषांनुसार मिळणार असल्याने त्यातून शेतकऱ्यांना फारसा दिलासा मिळणार नाही हे शाश्वत सत्य आहे. या वर्षीच्या संकटाकडे शासन-प्रशासनाने नेहमीचे संकट म्हणून पाहू नये. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या नोकरदाराला महिन्याचा पगार दिला नाही तर घर कसे चालणार म्हणून टाहो फोडला जातो. इथे तर मागिल तीन-चार वर्षांपासून राज्यातील शेतकऱ्यांचे सातत्याच्या नैसर्गिक आपत्तींने डोळ्यांदेखत पूर्ण पिक वाया जात असतांना त्यांनी घरसंसाराचा गाडा कसा चालवायचा, हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. राज्यांत अतिवृष्टीच्या निकषांत बदल करा, ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट कर्जमाफी जाहीर करा, अशा मागण्या शेतकरी करत आहेत. सरासरीपेक्षा १० टक्क्यांहून कमी पावसाला अवर्षण, तर १० टक्क्यांहून अधिक पावसाला अतिवृष्टी म्हणून संबोधले जाते. यानुसार अतिवृष्टीजन्य परिस्थिती राज्याच्या अनेक भागांत, विशेषतः मराठवाड्यात आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन जुन्या-नव्या निकषांनुसार नाही तर झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात भरपाई अथवा मदत मिळायला हवी. एवढेच नाही तर, शेतकऱ्यांना कर्जमाफी, शैक्षणिक फी माफी अशा सवलती मिळायला हव्यात. बदलत्या हवामानात सातत्याच्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे नुकसान वाढत आहे. अशा वेळी ओल्या दुष्काळावर नव्याने विचार करावा लागेल. भरपाईचे निकषही नव्याने ठरवावे लागतील. शक्य तितक्या लवकर शासन-प्रशासनाने शेतकऱ्यांना तातडीची मदत करावी कारण नुकतेच केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा करात कपात करून सर्वसामान्य नागरिकांना दिवाळीची भेट दिली खरी, परंतु या भेटीपासून शेतकरी वंचित राहता कामा नयेत. असे झाले तरच मराठवाड्यातील तसेच राज्यातील इतर भागांतील अतिवृष्टी अथवा ओल्या दुष्काळात शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

# माँ स्कंदमाता

माँ स्कंदमाता ही दुर्गेच्या नऊ रूपांपैकी पाचवी आहे आणि हिंदू नवरात्रीच्या पाचव्या दिवशी तिची पूजा केली जाते. तिचे नाव 'स्कंदाची आई' दर्शवते, जे युद्ध देव कार्तिकेय (ज्याला मुरुगन किंवा सुब्रह्मण्य असेही म्हणतात) चे पयार्यी नाव आहे. ती मातृत्व, करुणा आणि दैवी संरक्षणाचे प्रतीक आहे आणि सामान्यतः तिला चार हात असलेली पांढऱ्या रंगाची देवी म्हणून चित्रित केले जाते, ज्याने तिचा मुलगा कार्तिकेयला मांडीवर धरले आहे, दोन हातात कमळाची फुले आहेत आणि तिसरा हात अभय मुद्रेत (संरक्षणाचा हावभाव) आहे. ती बहुतेकदा कमळाच्या फुलावर बसलेली असते आणि कधीकधी सिंहावर स्वार होते, धार्मिकतेची शक्ती आणि धमार्चे वाहन मूर्त रूप देते.

प्रतीकात्मकता आणि महत्त्व

मातृत्व आणि ज्ञानः स्कंदमाता मातृशक्ती, करुणा आणि सर्व ज्ञानाची आई दर्शवते. तिची पूजा केल्याने तिचा मुलगा कार्तिकेय याची पूजा करण्याचे आशीर्वाद देखील मिळतात.

पवित्रता आणि ज्ञानः तिचा पांढरा किंवा शुद्ध रंग आणि कमळाशी तिचा संबंध पवित्रता आणि दैवीशी संबंध दर्शवितो.

धार्मिक कमर्ः धर्माच्या सिंहावर स्वार होऊन, ती धार्मिक कर्म आणि आत्म-नियंत्रणाच्या शक्तीचे प्रतीक आहे.

आध्यात्मिक विकासः स्कंदमातेची पूजा केल्याने आंतरिक शुद्धीकरण, मन शांत होण्यास आणि भक्ताला आध्यात्मिक साक्षात्कार आणि दिव्यत्वाच्या अनुभवाकडे नेण्यास मदत होते.

चित्रण

चार हातः तिचे चार हात आहेत.

कमळाची फुलेः तिच्या दोन हातात कमळाची फुले आहेत.

बाल स्कंदः तिने तिचा मुलगा कार्तिकेय (स्कंद) याला आपल्या मांडीवर धरले आहे.

अभय मुद्राः एक हात अभय मुद्रेत आहे, जो आशीर्वाद आणि संरक्षण देतो.

सिंहः तिला अनेकदा धर्माचे वाहन मानल्या जाणाऱ्या सिंहावर स्वार होताना दाखवले जाते.

कमळाचे आसनः तिला कमळावर बसलेले देखील दाखवले जाते, ज्यामुळे तिला देवी पद्मासन असे नाव मिळाले आहे.



# देवीच्या नऊ रुपांकडून महिलांनी काय शिकावे ?

महिषासुर उदे गं अंबे उदे असं म्हणत दुर्गेचे, आदीशक्तीचे जगभरात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले आहे. नवरात्रीचा सण हा दैवी स्त्री शक्तीचा उत्सव आहे. या नऊ दिवसात देवी दुर्गेच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. यात शैलपुत्री, ब्रम्हचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्ययन, कालरात्री, महागौरी, सिद्धीदात्री या रुपांची समावेश आहे. देवीचे प्रत्येक रुप हे वेगळे असून देवीच्या या रुपाकडून स्त्रीने शिकण्यासारखे, घेण्यासारखे बरेच आहे. ही नऊ रुपे स्त्रीची ताकद, अस्तित्वविषयी बरंच काही सांगतात. खरंतर स्त्री मध्ये प्रचंड शक्ती असते. तिने एखादी गोष्ट ठरवल्यास नक्कीच पूर्ण करू शकते, इतकी ताकद तिच्यात असते, गरज असते ती तीने स्वतःला ओळखण्याची.

शैलपुत्री - शैलपुत्री.. शैल म्हणजे पर्वत अर्थात हिमालयाची कन्या. या हिमालयाच्या कन्येकडून आपण आत्मविश्वास वाढवणे, स्वतःवर विश्वास ठेवणे आणि आपल्या जीवनाचा खरा उद्देश शोधणे या गोष्टी शिकू शकतो. हिमालय उंचावर असल्याने महिलांनी तिच्याकडून ध्येय गाठण्याची प्रेरणा घ्यावी. कठीण परिस्थितीतही टिकून राहण्याची जिद्ध घ्यावी.

ब्रम्हचारिणी - ब्रह्मचारिणी.. देवी ब्रह्मचारिणीकडून ज्ञान, तप, वैराग्य, त्याग, संयम, धैर्य आणि कठोर परिश्रमातून यश मिळवण्याचे सामर्थ्य शिकावे. त्यांनी महादेवाला प्रसन्न करण्यासाठी हजारो वर्षे कठोर तपश्चर्या केली. त्यामुळे स्त्रियांनी तिच्यात जग बदलण्याची ताकद आहे, हे ओळखावे.

चंद्रघंटा - चंद्रघंटा.. देवी चंद्रघंटा शौर्य, शक्ती आणि वाईट शक्तींचा नाश करण्याचे प्रतिक आहे. चंद्र हा शांत, शितल ग्रह आहे आणि तो बुद्धीमत्तेशी संबंधित आहे. त्यामुळे चंद्रघंटेकडून स्त्रियांनी शांत राहण्याचा गुण अंगिकारावा, मनावर नियंत्रण ठेवण्यास शिकावे.



कुष्मांडा - कुष्मांडा.. 'कु' म्हणजे थोडे, 'उष्मा' म्हणजे उष्णता किंवा ऊर्जा आणि 'अंड' म्हणजे ब्रह्मांड, यावरून तिच्या नावाचा अर्थ होतो की तिच्या मंद हास्यातून विश्वाची उत्पत्ती झाली. महिलांनी तिच्याकडून स्वतः चे अस्तित्व निर्माण करण्याची प्रेरणा घ्यावी.

स्कंदमाता - स्कंदमाता.. स्कंद देवीच्या रुप हे आपल्या मुलाला मांडीवर घेऊन सिंहासनावर बसलेली आहे. स्त्रियांनी ती वास्तल्याची मूर्ती ओळखावी.

कात्यायनी - अन्यायाविरुद्ध लढणारी अशी कात्यायनी.. महिलांनी कात्यायनीकडून अन्याय सहन न करता त्याच्याविरुद्ध आवाज उठवायला शिकले पाहिजे. केवळ स्वतःवरच नाही तर आजूबाजूला घडणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला हवे.

कालरात्री - काल म्हणजे वेळ. स्त्रियांनी कालरात्रीसारखे असावे.. कधीतरी शांत राहावे आणि मनाला विश्रांती द्यावी. स्त्री घर, कुटूंब , नोकरी या सर्वांकडे ती लक्ष देतेच. त्यामुळे कालरात्रीकडून स्त्रियांनी मनाला आणि शरीराला विश्रांती देण्यास शिकावे.

महागौरी - महागौरी .. देवीचे हे रुप आपल्याला संयम ठेवण्यास शिकवते, कारण निसर्गाच्या खेळात कोणतीही गोष्ट क्षणात घडत नाही. त्यामुळे महिलांनी योग्य वेळेची वाट पाहणे महागौरीकडून शिकायला हवे. महागौरी ही ज्ञान, मोक्ष यांचा संदेश देणारी आहे. खरं तर, स्त्रियांमध्ये हे गुण जन्मतःच असतात. गरज असते ती तिला या गुणांची जाणीव होण्याचीङ्ग

सिद्धीदात्री - सिद्धीङ्म म्हणजे अलौकिक शक्ती किंवा ध्यान करण्याची क्षमता. देवी या शक्तींचा दाता आहे. जग जिकण्याची ताकद आहे, तिने स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला हवे.

खरंतर, महिलांवरील वाढते अत्याचार पाहता महिलांनी स्वतः मधील दुर्गा, रणचंडी, काली, भवानी, जगदंबेला जागे करून स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी स्वतः ची लढाई लढण्यासाठी स्वतः मध्ये दडलेल्या देवीच्या या नऊ रुपांना जागे करणे ही काळाची गरज झाली आहे. नवरात्र उत्सवाचा अर्थ धार्मिक महत्त्वापलीकडे सांस्कृतिकदृष्ट्या खोलवर आहे, विशेषतः महिलांसाठी, हे प्रत्येकाने आत्मसात करायला हवे.

# नवमीला हवन करताय, लक्षात ठेवा या गोष्टी !

नवरात्रीचे पावन पर्व सुरु आहे. नवरात्रीमधील नवमीच्या दिवशी हवन केले जाते. नवरात्रातील नवमीच्या दिवशी हवन केलं जातं. नवरात्रीची पूजा महानवमीच्या हवनाशिवाय पूर्ण होत नाही. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल नवमीला हवन का करतात? चला तर हवनाचे धार्मिक महत्व, हवन करण्याची सोपी पद्धत आणि त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सामुग्रीबद्दल अधिक माहिती जाणून घेऊया. यामुळे तुमची नऊ दिवसाची साधना सफलतापूर्वक संपन्न होईल.

हवनाचे धार्मिक महत्व

शारदीय नवरात्रीचे पर्व आता सुरु झाले आहे आणि नवव्या दिवशी नवमी साजरी केली जाते. यंदा नवमी १ ऑक्टोबर २०२५ रोजी आहे. हा नवरात्र साधनेचा शेवटचा आणि सर्वात महत्वाचा दिवस असतो. नऊ दिवस दुगार्मातेची कठीण उपासना आणि व्रतानंतर महानवमीच्या दिवशी हवन करण्याची प्रथा आहे. शास्त्रानुसार हे हवन केलं नाही तर नवरात्रीची पूजा आणि व्रत अपूर्ण मानले जाते. आणि साधकाला साधनेचे पूर्ण फळ मिळत नाही.

होम-हवन पवित्र अनुष्ठान

होम-हवन हे एक पवित्र अनुष्ठान असून याद्वारे देवी-देवतांचे पूजन केले जाते. त्याचबरोबर हवनाने जवळपासच्या वातावरणाची शुद्धी होते. हवन हे नऊ दिवसांची भक्ती आणि संकल्पाच्या पूणार्हुतीचे प्रतीक आहे, ज्यामुळे माता दुर्गा प्रसन्न होऊन साधकाच्या सर्व मनोकामना पूर्ण करते.

हवनाचे धार्मिक महत्व

हिंदू धर्मात अग्नी देवाला मुख्य देवता असे मानलेले आहे.'अग्निमुखं वै देवाः'. धार्मिक मान्यतांनुसार हवनादरम्यान पवित्र अग्नीत दिलेली आहुती (तूप, हवन सामग्री इत्यादी) थेट देवी-देवतांपर्यंत पोहोचते. महानवमीला केलेले हवन म्हणजे नऊ दिवसांच्या साधनेत काही त्रुटी राहिली असेल तर क्षमायाचना करणे आणि देवीच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचे एक माध्यम असते. यामुळे दुर्गा माता प्रसन्न होते आणि पूर्ण वर्षभर तुमच्या घरावर तिची कृपादृष्टी राहते असे मानले जाते.



वातावरणाची शुद्धी आणि सकारात्मक ऊर्जा

हवनात आंब्याचा झाडाचे लाकूड, कापूर, तूप आणि विविध प्रकारची हवनाची सामग्री वापरली जाते. या सर्व गोष्टींचा वापर केल्या जातो. या सर्व सामग्री अग्नीच्या संपर्कात आल्यानंतर जो धूर उत्पन्न होतो तो वातावरणातील हानिकारक बॅक्टेरिया आणि व्हायरसला नष्ट करतो. यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होऊन सकारात्मक ऊजेर्चा प्रसार होतो. घरात सुख-शांती पसरते आणि प्रसन्न वातावरणाची निर्मिती होते.

हवनासाठी आवश्यक सामग्री

घरात सोप्या पद्धतीने हवन करण्यासाठी काही सामग्रीची आवश्यकता असते. यात एक छोटे हवन कुंड, आंब्याचा झाडाचे लाकूड, गायीचे शुद्ध तूप, कापूर, अक्षता, हवन सामग्री (जवस, काळे तीळ, तांदूळ, साखर वगैरेचे मिश्रण) आणि सुक्या खोबऱ्याच्या गोळ्याची गरज असते. पूजा सुरु करण्यापूर्वी या सर्व वस्तू एका जागी जमा करून ठेवा.

हवानाची सोपी पद्धत

सर्वात आधी स्वच्छ जागेवर हवन कुंडाची स्थापना करा.

आंब्याच्या झाडाची लाकडे हवनकुंडात व्यवस्थित रचा आणि कापराच्या मदतीने अग्नी प्रज्वलित करा.

यानंतर गणपती आणि नवग्रहांचे स्मरण करून अग्नीत तुपाची आहुती द्या.

आत 'ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे स्वाहा' या दुगार्मातेच्या नवार्ण मंत्राचा जप करताना तूप आणि हवन सामुग्रीची आहुती द्या.

शेवटी सुक्या खोबऱ्याच्या गोळ्याला छेद करून तो तुपाने पूर्ण भरा आणि त्याची पूणार्हुती द्या. यानंतर आरती आणि क्षमायाचना करा.

# कामाख्या मंदिर, गुवाहाटी



आसामच्या गुवाहाटीमध्ये वसलेले कामाख्या देवीचे मंदिर हे ५१ शक्तीपीठांपैकी एक प्रसिद्ध शक्तीपीठ आहे. भगवान विष्णूने देवी सतीच्या मृत शरीराचे ५१ तुकडे केले तेव्हा देवीचा योनी भाग या ठिकाणी पडला. त्यामुळे कामाख्या मंदिरात देवीची मूर्ती नसून देवीच्या योनीची पूजा केली जाते. धार्मिक मान्यतेनुसार येथे देवीचा योनी भाग असल्यामुळे येथे देवी रजस्वला होते आणि या काळात मंदिर बंद ठेवले जाते. कामाख्या देवी ही तांत्रिकांची मुख्य देवी आहे. त्यामुळे वर्षभर इथे साधू-अघोरींची वर्दळ असते.

देवी प्रत्येक वर्षी होते रजस्वला - या ठिकाणी देवीचा योनी भाग पडला होता. यामुळे देवी येथे प्रत्येक वर्षी तीन दिवसांसाठी रजस्वला होते. या काळात मंदिर बंद असते. तीन दिवसांनतर मंदिर पुन्हा उघडले जाते. मात्र या 3 दिवसांच्या काळात मंदिर बंद करण्यापूर्वी देवीच्या गाभाऱ्यात पांढरे वस्त्र ठेवले जाते. 3 दिवसांनंतर मंदिर उघडल्यावर हे पांढरे वस्त्र लाल झालेले असते. या कापडाला 'अम्बुवाची' कापड म्हणतात.

प्रसाद म्हणून देतात अम्बुवाची कापड - अम्बुवाची कापड हे इथे भक्तांना प्रसाद म्हणून दिले जाते. हे कापड घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. अनेक जण तासनतास रांगेत उभे राहून हे कापड प्रसाद म्हणून घेत असतात.

नदीही होते लाल - त्या तीन दिवसांच्या काळात कामाख्या मंदिराजवळून जाणारी ब्रह्मपुत्रा नदी देखील लाल होते. तसेच मंदिराच्या चार गाभाऱ्यांपैकी 'गर्वगिंहा' हे सती मातेचे गर्भ असल्याचे म्हंटले जाते.

वर्षातील मोठी जत्रा - दरवर्षी कामाख्याला मोठी जत्रा भरते, ज्याला 'अंबुवाची' जत्रा म्हणतात. ही जत्रा जूनमध्ये म्हणजेच जेव्हा तीन दिवस देवी रजस्वला होते त्या काळात भरते. या काळात कोणालाही मंदिरात प्रवेश दिला जात नाही. मग चौथ्या दिवशी मोठा उत्सव साजरा करून धुमधडाक्यात मंदिर पुन्हा खुले केले जाते.

# नवरात्रीदरम्यान स्वप्नामध्ये ९ कन्या दिसणे याचा अर्थ नेमकं काय जाणून घ्या...

हिंदू धर्मामध्ये वास्तूशास्त्राला आणि स्वप्नशास्त्राला विशेष महत्त्व दिले जाते. स्वप्नशास्त्रानुसार नवरात्रीच्या वेळी येणारी स्वप्ने सामान्य नसतात, परंतु ती भविष्यासाठी काही संकेत नक्कीच देतात. काही लोकांना नवरात्रीच्या स्वप्नात दुर्गा देवीशी संबंधित काही गोष्टी दिसतात तर काहींना स्वप्नातही मुली दिसतात. जर तुम्ही देखील नवरात्रीच्या वेळी स्वप्नात कन्या राशी पाहिली असेल तर ती तुमच्यासाठी खूप शुभ चिन्ह असू शकते. चला तर मग जाणून घेऊया स्वप्न विज्ञानानुसार स्वप्नात 9 मुली पाहणे म्हणजे काय? नवरात्रीच्या काळात स्वप्नात मुलगी दिसणे ही एक अतिशय शुभ चिन्ह मानली जाते, जी माता राणीची कृपा, संपत्ती, समृद्धी आणि सौभाग्याच्या आगमनाचे प्रतीक आहे. हे स्वप्न दाखवते की तुम्हाला दुर्गा मातेचा आशीर्वाद मिळणार आहे आणि तुम्हाला जीवनात सकारात्मकता, यश मिळणार आहे.

स्वप्नात 9 कन्या पाहण्याचा अर्थ काय आहे

स्वप्नशास्त्रानुसार, स्वप्नात 9 मुलींना पाहणे खूप शुभ आणि भाग्यवान मानले जाते. हे स्वप्न देवी लक्ष्मीची कृपा, संपत्ती, समृद्धी, सुख, शांती आणि येणा[illegible]या आनंदाचे प्रतीक मानले जाते. या स्वप्नाचा अर्थ असा आहे की तुम्हाला पितृ दोषापासून मुक्तता मिळेल आणि पुण्य फळ मिळणार आहे.

देवी कृपाः- हा देवी मातेचा थेट आशीर्वाद मानला जातो, याचा अर्थ असा आहे की तुम्हाला दुर्गा मातेची विशेष कृपा आहे.


संपत्ती आणि समृद्धी :- कन्या राशीचे स्वरूप हे घरात संपत्ती आणि समृद्धीचे लक्षण आहे.

सकारात्मक ऊजार्ः हे स्वप्न जीवनात वाढत्या सकारात्मकतेचे आणि आध्यात्मिक ऊजेर्चे लक्षण आहे.

कामात यश :- कन्या देखील माता लक्ष्मीचे रूप मानले जाते, हे कार्य क्षेत्रातील यश आणि व्यवसायात नफ्याचे प्रतीक देखील आहे.

एक दैवी चिन्ह

स्वप्नशास्त्रानुसार, नवरात्रीच्या वेळी स्वप्नात मुलगी दिसणे हे केवळ एक दृश्य नाही, तर ते देवीचे दैवी चिन्ह आहे. हे जीवनात येणाऱ्या चांगल्या घटना आणि देवीची पूजा करण्याचे महत्त्व दर्शविते.



जर तुम्हाला असे स्वप्न पडले तर काय करावे?

जर तुम्हाला नवरात्रीच्या वेळी स्वप्नात मुलगी दिसली तर देवीची पूजा करा आणि आपले कर्म अधिक पवित्र करा. तुम्ही नऊ मुलींची पूजा करून त्यांना खाऊ घालू शकता, ज्यामुळे दुगार्मातेचा अधिक आशीर्वाद मिळतो.

# उपवासाच्या वेळी ऊर्जा वाढवणारे हे ५ ड्रिंक्स

उपवास करताना निरोगी आणि उत्साही शरीर राखणे अत्यंत महत्वाचे आहे, कारण जास्त वेळ रिकाम्या पोटी राहिल्याने अशक्तपणा, थकवा आणि डिहायड्रेशन होऊ शकते. म्हणूनच, घन पदार्थांसोबत तुमच्या आहारात निरोगी पेये समाविष्ट करणे फायदेशीर आहे. हे पेये केवळ ऊर्जा प्रदान करत नाहीत तर शरीराला विषमुक्त करण्यात, वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करतात आणि त्वचेचा तजेला वाढवतात. याशिवाय, ही पेये शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित ठेवतात, पचन सुधारतात आणि मन प्रसन्न ठेवण्यासाठीही उपयुक्त ठरतात. उपवासाच्या काळात हलकी, पचायला सोपी आणि नैसर्गिक घटकांनी बनवलेली पेये घेतल्यास दिवसभर ताजेतवानेपणा आणि स्फूर्ती टिकून राहते.चला तर पाहूया, उपवास करताना सेवन करण्यासाठी ५ सर्वोत्तम निरोगी आणि ऊर्जा देणारी पेये जी तुमचे आरोग्य आणि उत्साह दोन्ही जपतील.

फळांचा ज्यूस

फायदेः जीवनसत्त्वे व खनिजे मिळतात, ताजेतवाने ठेवतात.

कोणते फळ योग्यः डाळिंब, सफरचंद, द्राक्षं किंवा पपईचा रस.

कसे प्यावेः साखर न घालता ताजं ज्यूस प्या.

ताक

ताक थंडावा आणि पचनशक्ती वाढवणारे म्हणून काम करते. उपवास करताना ताक पिणे हा देखील एक उत्तम पर्याय आहे. ते शरीराला थंड करते, निर्जलीकरण रोखते आणि पचन सुधारते. ताकात सैंधव मीठ, जिरे पावडर आणि पुदिना मिसळल्याने त्याची चव वाढते. ते त्वचेला हायड्रेट ठेवते आणि गॅस आणि ॲसिडिटीसारख्या समस्यांपासून आराम मिळतो. उपवास करताना तुमच्या आहारात या पाच निरोगी पेयांचा समावेश केल्याने उजेर्ची पातळी राखण्यास, थकवा दूर करण्यास आणि तुम्हाला हलके वाटण्यास मदत होईल.

मखाना आणि बदाम स्मूदी

मखाना आणि बदाम हे दोन्ही उपवासासाठी सुपरफूड मानले जातात. त्यांच्यापासून बनवलेली स्मूदी आरोग्यदायी आणि स्वादिष्ट असते. ते बनवण्यासाठी, भिजवलेले मखाना आणि बदाम दुधात मिसळा, नंतर थोडे मध घाला. या स्मूदीमध्ये प्रथिने, निरोगी चरबी आणि फायबरचे प्रमाण जास्त असते, जे तुम्हाला जास्त काळ पोट भरलेले ठेवते आणि दुप्पट ऊर्जा प्रदान करते.

नारळ पाणी

एक नैसर्गिक ऊर्जा पेय. उपवासाच्या वेळी पिण्यासाठी नारळ पाणी हे सर्वात आरोग्यदायी आणि नैसर्गिक पेयांपैकी एक आहे. इलेक्ट्रोलाइट्स, पोटॅशियम आणि खनिजांनी समृद्ध असलेले हे पेय त्वरित ऊर्जा प्रदान करते आणि निर्जलीकरण रोखते. नारळ पाणी हलके आणि पोटासाठी आरामदायी आहे. ते त्वचेला हायड्रेटेड आणि चमकदार ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे उन्हाळ्याच्या हंगामात ते एक आदर्श पर्याय बनते.

लिंबाचा रस

हे पेय विषारी पदार्थ काढून टाकण्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी आदर्श आहे. लिंबाचा रस हे एक साधे पण अत्यंत प्रभावी पेय आहे. उपवास करताना लिंबाचा रस पिल्याने शरीर विषारी पदार्थ काढून टाकते आणि पचन सुधारते. त्यातील व्हिटॅमिन सीचे प्रमाण रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि त्वचेला नैसर्गिक चमक देते. तुम्ही या पेयामध्ये सैंधव मीठ आणि मध घालू शकता, ज्यामुळे त्याची चव वाढेल आणि वजन कमी करण्यास देखील मदत होईल.



# ६० कोटींच्या फसवणुकीत शिल्पा शेट्टी लाभार्थी ? बँक खात्यात १५ कोटी जमा झाले...

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज कुंद्रा याने व्यावसायिकाच्या ६० कोटी रुपयांच्या केलेल्या आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणात आता अभिनेत्री शिल्पा शेट्टीचे देखील नाव समोर आले आहे. यापैकी १५ कोटी रुपये शिल्पा शेट्टीच्या बँक खात्यात वळविण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. हे पैसे शिल्पा शेट्टीच्या बँक खात्यात का वळविण्यात आले त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करीत असून यासंदर्भात शिल्पा शेट्टीची चौकशी करण्यात येणार आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती आणि चित्रपट निमार्ता राज कुंद्रा याच्याविरोधात व्यावसायिक दीपक कोठारी याची ६० कोटी ४८ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी १४ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल केला आहे. आर्थिक गुन्हे शाखेने १८ सप्टेंबर रोजी राज कुंद्राची ५ तास चौकशी केली होती.



वैयक्तिक कामासाठी पैसे खर्च

या चौकशीदरम्यान कुंद्रावर करण्यात आलेल्या आरोपांबाबत त्याची बाजू ऐकून घेण्यात आली. गुंतवलेले पैसे कुठे वापरले आणि कोणत्या उद्देशासाठी खर्च झाले याचा तपास करण्यात येत आहे. चौकशीदरम्यान राज कुंद्रा याने ५ कंपन्यांमध्ये पैसे वळविल्याची कबुली दिली आहे. त्यात सतयुग गोल्ड, विहान इंडस्ट्रीज, इसेन्सिशअल बल्क कमोडिटी प्रायव्हेट लिमिटेड, बेस्ट डिल आणि स्टेटमेंट इंडिया या कंपन्यांचा समावेश आहे. कुंद्राच्या बॅंक खात्याच्या तपशीलांवरून त्याने २५ कोटी रुपये वैयक्तिक कामासाठी खर्च केल्याच आढळले आहे. राज कुंद्राने या ६० कोटी रुपयांपैकी १५ कोटी रुपये पत्नी व अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या कंपनीच्या बँक खात्यात वळविल्याची माहिती समोर आली आहे. शिल्पा शेट्टीच्या खात्यात एवढी रक्कम कशी गेली याची चौकशी आर्थिक गुन्हे शाखा करणार आहे. हे पैसे खात्यात आल्याबद्दल शिल्पा शेट्टीने बिल सादर केले. हे बिल कुठले होते ? ते कसे बनवले गेले ? त्याचा तपास केला जात आहे. कंनपीच्या दिवाळखोरी प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकार्य़ांनी यासंदर्भात राज कुंद्राकडून कागदपत्रे मागितली होती. मात्र अद्याप ती सादर करण्यात आलेली नाहीत.

राज कुंद्रा, शिल्पा शेट्टीची चौकशी होणार

या प्रकरणात आठवड्याच्या शेवटी आर्थिक गुन्हे शाखा राज कुंद्राला समन्स देऊन पुन्हा चौकशी करणार आहे. त्यानंतर शिल्पा शेट्टीला देखील तपासासाठी बोलावण्यात येणार आहे. राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टी हे अनेकदा परदेशात जात असतात, मात्र ते आता देशाबाहेर जाऊ नयेत, म्हणून लूक आऊट नोटीस काढण्यात आली आहे.

प्रकरण काय ?

राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टी हे बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड या ऑनलाइन शॉपिंग प्लॅटफॉर्मचे संचालक होते. फियार्दी व्यवसायिक दीपक कोठारी यांनी २०१५ ते २०२३ दरम्यान कुंद्रा दांपत्याच्या बेस्ट डील प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत ६० कोटी ४८लाख रुपयांची गुंतवणूक केली होती. या कंपनीतील ८७.६ टक्के शेअर्स या दोघांच्या नावावर होते. दरम्यान, एप्रिल २०१५ मध्ये त्यांनी 'शेअर सबस्क्रिप्शन ऍग्रीमेंट' अंतर्गत कंपनीत ३१.९ कोटी रुपये गुंतवले. त्यानंतर सप्टेंबर २०१५ मध्ये सप्लिमेंटरी ऍग्रीमेंट अंतर्गत आणखी २८.५३ कोटी रुपये वळते (ट्रान्सफर) केले. शिल्पा आणि राज यांनी ही रक्कम वैयक्तिक खर्चांसाठी वापरली ,असा आरोप दीपक कोठारी यांनी तक्रारीत केला आहे. तपास अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या प्रकरणात व्यवसायिकाला जाणूनबुजून २६ टक्के शेअर्स देण्यात आले नाहीत, अन्यथा राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाला (एनसीएलटीमध्ये) माहिती द्यावी लागली असती. तसेच ६० कोटी रुपयांपैकी काही रक्कम सिस्टर कंपनीला दिली गेल्याचे समोर आले आहे.

## सोहराबुद्दीन शेख बनावट चकमक प्रकरणी उच्चकोर्टाच्या निकालाला हायकोर्टात आव्हान





■ **मुंबई। प्रतिनिधी:**

गुजरात पोलिसांच्या बनावट चकमकीत ठार झालेल्या सोहराबुद्दीन शेख याचा भाऊ रुबाबुद्दीन शेख यांनी २२ आरोपींना निर्दोष सोडण्याच्या विशेष सीबीआय न्यायालयाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. डिसेंबर २०१८ मध्ये या प्रकरणात निर्णय देण्यात आला होता. याविरुद्ध केलेल्या अपिलावर दोन आठवड्यांनी सुनावणी होणार आहे. मुख्य न्या. चंद्रशेखर व न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठापुढे बुधवारी या अपिलावर सुनावणी झाली. हे प्रकरण सीबीआयविरोधात असताना अपिलात महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान सरकारला प्रतिवादी का केले? असा सवाल न्यायालयाने शेख यांच्या वकिलांना केला. इतक्या विलंबाने विशेष सीबीआय न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान का दिले? असा प्रश्न उपस्थित करत न्यायालयाने दोन आठवड्यांनी उत्तर देण्याचे निर्देश शेख यांना दिले. डिसेंबर २०१८ मध्ये विशेष सीबीआय न्यायालयाने सोहराबुद्दीन शेख, कौसर बी आणि तुलसीराम प्रजापती हत्येप्रकरणी २२ आरोपींची सुटका केली. त्यांची सुटका करताना न्यायालयाने म्हटले की, आरोपींनी कथित गुन्हा हा त्यांच्या कर्तव्याचे पालन आणि पदाचा अधिकाराचा उपयोग करताना केला.

## प्रभादेवी पुलबाधितांचे पुनर्वसन... म्हाडाकडून एमएमआरडीएला ११९ घरांची यादी सादर

■ **मुंबई। प्रतिनिधी:**

शिवडी - वरळी उन्नत रस्ता प्रकल्पाअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रभादेवी द्विस्तरीय पुलाच्या कामात बाधित होणाऱ्या दोन इमारतींमधील ८३ रहिवाशांसाठी अखेर म्हाडाने आसपासच्या परिसरातील ११९ घरे शोधली आहेत. या घरांची यादी नुकतीच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) सादर करण्यात आली आहे. आता रहिवाशांच्या पसंतीनुसार घरे निश्चित करून त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. रहिवाशांच्या पसंतीनुसार ११९ पैकी ८३ घरे एमएमआरडीएला वर्ग करण्यात येणार असून यासाठी एमएमआरडीएकडून शीघ्रगणकाच्या ११० टक्के दराने रक्कम घेण्याचा म्हाडाचा प्रस्ताव आहे. अटल सेतूला जोडणारा शिवडी-वरळी उन्नत रस्ता प्रभादेवी पूल ओलांडून जात आहे. त्यामुळे जुना पूल पाडून त्याजागी नवीन द्विस्तरीय पूल बांधण्यात येणार आहे. जुन्या पुलाचे पाडकाम सध्या एमएमआरडीए करीत आहे. या पुलाच्या कामात हाजी नुरानी आणि लक्ष्मी या दोन इमारती बाधित होत असून यात ८३ घरे आहेत. या ८३ रहिवाशांचे पुनर्वसन म्हाडाच्या घरात करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. म्हाडाला पुनर्विकासाच्या माध्यमातून विकासकाकडून उपलब्ध झालेली घरे या रहिवाशांना कायमस्वरुपी दिली जाणार आहेत. या निर्णयाप्रमाणे एमएमआरडीएने म्हाडाकडे घरांची मागणी केली होती. या मागणीनुसार दादर आणि आसपासच्या ठिकाणची ११९ घरे म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने शोधल्याची माहिती मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली. या घरांची यादी एमएमआरडीएला सादर करण्यात आली आहे. आता ही घरे रहिवाशांना दाखवण्यात येणार असून त्यांच्या पसंतीनंतर घराच्या वितरणाचा अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. म्हाडाकडून घराची यादी प्राप्त झाली असून त्यावर पुढील कार्यवाही सुरू असल्याची माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. पुनर्वसनासाठी दुरुस्ती मंडळाने शोधलेली घरे ३०० ते ६५० चौरस फुटांची असून रहिवाशांना किमान ४०५ चौरस फुटांचे घर मिळणार आहे. त्यामुळे ४०५ ते ६५० चौरस फुटांच्या घरांची निश्चिती एमएमआरडीएकडून केली जाण्याची शक्यता आहे. या घरांसाठी शीघ्रगणकाच्या ११० टक्के दराने एमएमआरडीएला रक्कम मोजावी लागणार आहे.

## एपीएमसी निवडणूक घ्या, प्रशासक नियुक्ती रद्द



■ **मुंबई। प्रतिनिधी:**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी)वर प्रशासक नेमण्याची राज्य सरकारची कृती केवळ बेकायदा नाही, तर दुर्दैवी आहे, असे म्हणत मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य सरकारचा मुंबई एपीएमसीवर प्रशासक नेमण्याचा निर्णय रद्द केला. तसेच एपीएमसीला तातडीने निवडणूक घेण्याचे निर्देश दिले. मुंबई एपीएमसीवर नियुक्त केलेल्या विद्यमान प्रशासकाने सर्व कार्यभार पूर्वी निवडून आलेल्या संचालक मंडळाच्या हाती सोपवावा आणि या संचालक मंडळाने नवीन संचालक मंडळ येईपर्यंत धोरणात्मक निर्णय घेऊ नये, असे निर्देश न्या. रेवती मोहिते डेरे व न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने दिले. मुदतवाढ मान्य न केल्याने उपसभापतींसह संचालकांनी न्यायालयात धाव घेतली. मुंबई एपीएमसीचा कार्यकाल ३१ ऑगस्ट २०२५ रोजी संपुष्टात आला. त्यापूर्वी ७ ऑगस्ट रोजी याचिकाकर्त्यांनी संचालक मंडळाला ३१ ऑगस्टनंतर सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याची विनंती राज्य सरकारला केली. ठरलेल्या मुदतीत निवडणूक घेण्यास एपीएमसी अपयशी ठरली, असा आरोप याचिकाकर्त्यांनी केला. काय म्हणाले न्यायालय? प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच प्रशासकाची नियुक्ती करण्यात आल्याची दखल न्यायालयाने यावेळी घेतली.

## अभिनेत्री पूजा बॅनर्जीची दीड कोटींची फसवणूक, फरार निर्मात्याला अटक



■ **मुंबई। प्रतिनिधी:**

अभिनेत्री पूजा बॅनजीर्ची दीड कोटी रुपयांची फसवणूक करणारा निमार्ता श्याम डे याला अखेर बांगूर नगर पोलिसांनी कोलकाता येथून अटक केली. ओटीटीवर १६ चित्रपट प्रदर्शित करण्याचे हक्क मिळविण्याचे आश्वासन देऊन ही फसवणूक केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. अभिनेत्री पूजा बॅनर्जी मालाड येथे राहते. तिने अनेक हिंदी, तमीळ आणि भोजपुरी चित्रपटात काम केले आहे. तिचा निर्मात शाम डे (४७) याच्यासोबत आर्थिक वाद होता. जुलै महिन्यात तिने बांगूर नगर पोलीस ठाण्यात बॅनर्जीविरोधात दीड कोटी रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार केली होती. तेव्हापासून श्याम डे फरार होता. अखेर त्याला बांगूर नगर पोलिसांच्या पथकाने कोलकात्यामधून अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता २६ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. डे याने यापूर्वी मनीष सिंघानिया याची पावणेतीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. त्यासंदर्भात त्याच्याविरोधात कोलकाता येथील एका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

नेमके प्रकरण काय ?

अभिनेत्री पूजा बॅनजीर्ने बांगूर नगर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, एप्रिल २०२५ मध्ये निमार्ता श्याम डे याने ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणाऱ्या १६ नव्या चित्रपटांच्या प्रदर्शनाचे हक्क मिळविण्यासाठी गुंतवणूक करण्यास सांगितले होते. यासाठी व्हायकॉम १८ या कंपनीसोबत व्यवहार सुरू असल्याचा दावा केला. या संदर्भात एका ई-मेलचा स्क्रीनशॉटही दाखवला. यावर विश्वास ठेवून पूजा व कुणाल यांनी ९ एप्रिल रोजी गुंतवणुकीचा करार केला. यानंतर १७ एप्रिल ते ५ मे दरम्यान दोघांनी मिळून ह्यशॅडो फिल्म्सह्, ह्यमाधव एंटरप्रायझेसह्य आणि ह्यअल्ट्रा ट्रॅव्हल्सह्च्या खात्यांमध्ये एकूण १ कोटी ६८ लाख रुपये बॅंक खात्यात पाठवले.

काही दिवसांनी श्याम डे आजारी पडला. त्याच्यावर कोकिळाबेन रुग्णालयात उपचाराचा खर्चही पूजा आणि कुणाल यांनी केल्याचा दावा केला आहे. मात्र, करारानुसार परतावा मिळत नसल्यामुळे त्यांनी श्याम डे यांच्याकडे पैसे परत मागितले. श्याम डे याने जूनअखेरपर्यंत पैसे परत देण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात केवळ १० लाख रुपयेच परत केले. त्यामुळे पूजा बॅनजीर्ने बांगूर नगर पोलीस ठाण्यात फसवणुकीची तक्रार दाखल केली. त्यानुसार बांगूर नगर पोलिसांनी १६ जुलै रोजी श्याम डे याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता.

## प्रेयसी आणि तिच्या मुलाच्या हत्येचा प्रयत्न... लिव्ह इन पार्टनर'ला अटक

■ **मुंबई। प्रतिनिधी:**

एका प्रियकराने 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये राहणाऱ्या प्रेयसीला औषधाच्या गोळ्या खायला घालून, तसेच तिच्या साडेतीन वर्षाच्या मुलाचा वायरने गळा आवळून हत्या करण्याचा प्रयत्न केला. मालाडच्या मालवणी परिसरात बुधवारी दुपारी ही घटना घडली. यात सदर महिला आणि तिचा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मालवणी पोलिसांनी आरोपी प्रियकराला अटक केली आहे. पीडित महिला २३ वर्षांची असून तिला साडेतीन वर्षांचा मुलगा आहे. ती पतीसोबत मिरा रोड येथे राहात होती. मात्र तिचे पतीसोबत पटत नव्हते. दरम्यान, ती प्रियंक उर्फ सिध्दार्थ पटेल (३९) याच्या संपर्कात आली. दोघांचे प्रेमसंबध जुळले. त्यानंतर ती मागील एक महिन्यापासून मालाडमधील गावदेवी मंदिर रस्त्यावरील जुलूसवाडी परिसरातील यादव चाळीत सिध्दार्थ पटेल सोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहू लागली. सिध्दार्थ पटेल हा खासगी कंपनीत नोकरीला होता.



माझ्यासोबत रहायचे असेल तर पहिल्या पतीसोबत पूर्णपणे संबंध तोडावे लागतील, असे सिध्दार्थने पीडित महिलेला बजावले होते. मात्र तरीही ती पतीला भेटत होती. दोन दिवसांपूर्वी ती पतीला भेटण्यासाठी मिरा रोडला गेली होती. ही बाब सिध्दार्थला समजली आणि त्यावरून त्याने पीडित महिलेसबोत भांडण केले. त्याने पीडितेला मारहाण केली आणि घरातील क्रोसिनच्या गोळ्या तिला बळजबरीने खायला लावल्या. तसेच वायरने तिच्या साडेतीन वर्षांच्या मुलाचा गळा आवळला.

महिलेने त्या अवस्थेत पोलिसांच्या नियंत्रण कक्षाशी १०० क्रमांवर संपर्क साधून मदत मागितली. शेजारीही मदतीला धावले. काही वेळातच पोलीस तेथे पोहोचले. पोलिसांनी महिला आणि मुलाची सिध्दार्थच्या तावडीतून सुटका केली. या दोघांना कांदिवलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर (शताब्दी) रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे. कौटुंबिक वादातून हा प्रकार झाल्याचे प्रथमदर्शनी समोर आल्याचे मालवणी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी सांगितले. आम्ही आरोपी सिध्दार्थ पटेल याला अटक केली असून त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केल्याचे त्यांनी सांगितले. रुग्णालयातून महिला घरी आल्यावर सविस्तर जबाब नोंदवून पुढील कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## गोरेगावमध्ये म्हाडाची ३८ मजली व्यावसायिक इमारत; प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर

■ **मुंबई। प्रतिनिधी:**



गोरेगाव (पश्चिम) येथील पत्राचाळ पुनर्विकासाअंतर्गत म्हाडाच्या मुंबई मंडळाला विक्री घटकाअंतर्गत उपलब्ध झालेल्या आर-५ भूखंडावर मंडळाने उत्तुंग अशी व्यावसायिक इमारत उभारण्याचा निर्णय घेतला आहे. गोरेगावमध्ये सुमारे ७५० खर्च करून ३८ मजली व्यावसायिक इमारत उभारण्यात येणार असून मंडळाने यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारला सादर केला आहे. या व्यावसायिक इमारतीचे बांधकाम कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सी (सी अँड डी) प्रारुपानुसार अर्थात खासगी विकासकाची नियुक्ती करून केली जाणार आहे. या प्रकल्पातून मुंबई मडंळाला अधिमूल्याच्या रुपात ३५० कोटी रुपये महसूल मिळणार आहे. तर किमान १० हजार ४०० चौरस मीटर क्षेत्रही उपलब्ध होणार आहे. राज्य सरकारकडून या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेस सुरुवात करण्यात येणार आहे. मंडळाला या प्रस्तावाच्या मान्यतेची प्रतीक्षा आहे. पत्राचाळ पुनर्विकासातून उपलब्ध झालेल्या ९ हजार ९६८ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या आर-५ भूखंडावर व्यावसायिक इमारत उभारण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. मंडळाने सल्लागार कंपनीनकडून या इमारतीचा सविस्तर आराखडा तयार करून घेतला आहे. आराखड्यानुसार या भूखंडावर ३८ मजली इमारत बांधण्यात येणार असून यात दोन विंग्ज असणार आहेत. तर या इमारतीची रचना आकर्षक असेल. खासगी कंपन्यांसह आंतरराष्ट्रीय कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी या इमारतीत अनेक सुविधा दिल्या जाणार आहेत. त्याचवेळी चार रेस्टॉरन्ट, मंगल कार्यालय, १०० खोल्यांचे हॉटेल आदीही सुविधा यात असणार आहे. या प्रकल्पाचा प्रस्ताव काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविल्याची माहिती म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

## हाताच्या नसा कापल्या गेल्या अन्... पोलिसाच्या मृत्युचे कोडे उलगडले

■ **मुंबई। प्रतिनिधी:**

मुंबई पोलीस दलातील मयत कर्मचाऱ्याच्या पत्नी आणि मुलाला अटक झाल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. पोलीस कर्मचारी प्रवीण शालिग्राम सूर्यवंशी यांचा मे महिन्यात मृत्यू झाला होता. त्यांच्या हाताच्या नसा कापल्या गेल्या होत्या, तसेच डोक्यालाही गंभीर जखमा झाल्या होत्या. पोलिसांनी सुरूवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. सायन पूर्वमधील प्रतिक्षानगर पोलीस अधिकारी वसाहतीतील घरात प्रवीण सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यू प्रकरणी पोलिसांनी त्यांची पत्नी स्मिता आणि मुलगा प्रतिक यांना अटक केली आहे.

पोलीस अधिकाऱ्याचा कसा झाला होता मृत्यू?




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवीण सूर्यवंशी यांचा मृत्यू अपघाती झाल्याचे सुरूवातीला मानले गेले होते. मात्र, याचा तपास केल्यानंतर पत्नी आणि मुलासोबत वाद झाल्याचा मुद्दा समोर आला. मे महिन्यात प्रवीण सूर्यवंशी याचा पत्नी स्मिता आणि मुलगा प्रतिक यांच्यासोबत घरात वाद झाला. पत्नी आणि मुलासोबत प्रवीण सूर्यवंशी यांची झटापट झाली. त्यावेळी दोघांनी त्यांना जोरात ढकलून दिले. खिडकीच्या काचेवर जाऊन आदळले.

## कांदिवलीत सिलिंडरचा पाण्यात उलटा ठेवून वापर

■ **मुंबई। प्रतिनिधी:**



स्वयंपाकाच्या गॅसच्या सिलिंडरमधून गळती झाल्याने भीषण आग लागून सात जण होरपळल्याची घटना बुधवारी सकाळी ९ च्या सुमारास कांदिवली येथे घडली. मिलिटरी मार्गावरील ह्यईएसआयसीह्ण रुग्णालयामागील राम किसन मेस्त्री चाळीतील एका गाळ्यात ही घटना घडली. गळती होत असलेला गॅस साचून राहिल्याने अचानक भडका उडाला आणि दुर्घटना घडली. आगीत होरपळलेल्या सर्व जखमींवर विविध ठिकाणच्या तीन रुग्णालयांत उपचार सुरू असून, जखमींमध्ये एक पुरुष व सहा महिलांचा समावेश आहे. बऱ्याच दिवसांपासून ही गॅस गळती सिलिंडरमधून होत होती, मात्र गाळेधारक गॅस सिलिंडर पाण्यात उलटा करून त्याचा वापर करत होते. त्यांच्या याच निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे. गॅस गळती सुरू असतानाच अचानक शॉर्ट सर्कीट झाला आणि ठिगणी उडाली. त्यामुळे गॅसचा भडका उडाला आणि तेथे असलेले सर्वच जण होरपळले. त्याठिकाणी काही तेलाचे डबेही होते. त्यांनीही पेट घेतल्यामुळे आगीने रौद्ररूप धारण केले आणि सात जण गंभीर भाजले. या दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. विद्युत यंत्रणा व विजेच्या तारांमुळे आग पसरल्याची माहिती अग्निशमन दलाने दिली.

पोलिस काय म्हणतात?

समतानगर पोलिसांच्या म्हणण्यानुसार, बुधवारी सकाळी सुमारे नऊ वाजता, शिवानी आणि त्यांच्या सहा सहकाऱ्यांनी दुकानात स्वयंपाक सुरू केला असताना अचानक आग भडकली. प्राथमिक तपासानुसार, गॅसगळतीमुळे आग लागली असून ती इलेक्ट्रिक वायरिंग, एलपीजी सिलिंडर, रेग्युलेटर आणि स्टोव्हद्वारे आणखी भडकली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००01४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com